स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या मानव विद्याशाखेंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी.(विद्यावाचस्पती) साठी सादर करावयाचा शोधप्रबंधाचा संक्षिप्त आराखडा

शीर्षक

“सदानंद देशमुख यांच्या साहित्यातील ग्रामीण संस्कृती आणि बदलते ग्रामजीवन”

संशोधक

प्रा.वानखेडे बालाजी बाबूराव

एम.ए.(मराठी, राज्यशास्त्र), बी.एड., नेट

मार्गदर्शक

प्रा.डॉ.मार्तंड दिवाकर कुलकर्णी

सहयोगी प्राध्यापक मराठी विभाग प्रमुख,

संशोधक मार्गदर्शक, सरस्वती विद्यामंदीर, कला महाविद्यालय, किनवट जि.नांदेड

सहमती पत्र

दि.   /   /

श्री बालाजी बाबूराव वानखेडे यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या मानव्य विद्याशाखेंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी.साठी विषय निवडला आहे व त्यांच्या संशोधनाचा विषय **'सदानंद देशमुख यांच्या साहित्यातील ग्रामीण संस्कृती आणि बदलते ग्रामजीवन'** हा आहे.

या करीता हे सहमती प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

मार्गदर्शक

प्रा.डॉ.मार्तंड दिवाकर कुलकर्णी

सहयोगी प्राध्यापक मराठी विभाग प्रमुख,

संशोधक मार्गदर्शक, सरस्वती विद्यामंदीर,

कला महाविद्यालय, किनवट जि.नांदेड

प्रस्तावना :-

माझ्या शोधप्रबंधाचा विषय **“सदानंद देशमुख यांच्या साहित्यातील ग्रामीण संस्कृती आणि बदलते ग्रामजीवन”** हा आहे.

मराठी ग्रामीण साहित्यात संशोधन करुन ग्रामीण साहित्य विश्वातील समस्या, प्रश्न, परिणाम, प्रभाव, संस्कृती, बदलते ग्रामजीवन, कृषिकेंद्रितता, जागतिकीकरण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, सामाजिक ताणतणाव, गावगाडा यांच्या वरील विषयात शास्त्रीय संशोधन करण्यासाठी या विषयाची निवड केली आहे. ग्रामीण साहित्यातील अनेक प्रश्नांची, समस्यांची दखल घेऊन या विषयात काही गृहीतके ठरवून निष्कर्ष काढले जाणार आहेत. ते प्रस्तुत शोधप्रबंधात दिसून येतील.

ग्रामीण साहित्यात आजवर विपुल संशोधन झाले. मात्र १९९० नंतरच्या कालखंडात ग्रामीण साहित्याच्या कथा विस्तारीत करणाऱ्या सदानंद देशमुख यांच्या साहित्यातील संस्कृती आणि बदलत्या ग्राम जीवनाचा अनुबंध उलगडणे गरजेचे वाटले म्हणून हा विषय निवडला. या विषयाच्या संशोधनाने ग्रामीण साहित्य, ग्रामसंस्कृतीचे नव्याने आकलन होण्यास मदत होईल.

ग्रामीण भागातील जीवनदर्शन त्यांची सुखदुःखे, व्यथा, वेदना, जीवनपद्धती, संस्कृती, त्यांच्या पुढील आव्हाने कोणती हे निदर्शनास आल्याशिवाय त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकत नाही. या गोष्टीसाठी या विषयाची गरज संशोधन कर्त्यास वाटते. ग्रामीण साहित्याचे उद्दिष्टये कोणती ? त्यांचा उद्देश काय ? याचे पुढील प्रमाणे काही मुद्दयांच्या आधारे शास्त्रीय विवेचन केले जाईल. ग्रामीण साहित्यातून ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडविणे, ग्रामीण साहित्यातून ग्रामीण संस्कृतीच्या बदलत्या प्रवाहांचा शोध घेणे, ग्रामीण सामाजिक जीवनपद्धतीचा आढावा घेणे, ग्रामीण साहित्यातून आलेल्या भावभावनांचे विवेचन करणे, ग्रामीण समस्यांची उकल करणे व उपयांचा वेध घेणे, ग्रामीण वास्तववादी जीवन, सुखदुःखे, व्यथा-वेदनांचा आढावा घेऊन बदलत्या ग्रामजीवनाचे दर्शन घडवणे आणि सदानंद देशमुख यांचे ग्रामीण

साहित्यातील स्थान स्पष्ट करणे इत्यादी उद्दिष्टये संशोधकाचे असून त्याचे शास्त्रीय विवेचन शोधप्रबंधात केले जाणार आहे.

ग्रामीण साहित्याचा विचार करीत असतांना या ग्रामीण साहित्याची व्याप्ती किती मोठी आहे याचा विचार केल्यास ग्रामीण साहित्य आजच्या घडीला अनेक प्रश्नांना व समस्यांना आपल्या कक्षेत सामावून घेतांना दिसते. तिची व्याप्ती ही फार मोठी आहे. त्यात ग्रामीण जीवन, संस्कृती, गावगाडा, निसर्ग, शेती, व्यवसाय, सण, उत्सव, पार आणि शिवार, कारू-नारू, जागतिकीकरण, लोकसंस्कृती, लोकसमजूती, संकेत, प्रथा, रूढी, परंपरा, श्रध्दा-अंधश्रध्दा, बदलते ग्रामजीवन, मूल्यहीन समाजरचना, भौतिक सुखाच्या मृगजळात भरकटलेली तरूण पिढी अशा कितीतरी प्रश्नांची दखल ग्रामीण साहित्याने घेऊन आपली व्याप्ती मोठी करण्याचे प्रयत्न करतांना दिसते. यांचे या संशोधन विषयांतर्गत सखोल व शास्त्रीय विवेचन करण्याचा संशोधकाचा मानस आहे.

ग्रामीण साहित्याची जशी व्याप्ती मोठी आहे तशाच काही मर्यादा सुध्दा आहेत. त्या कोणकोणत्या आहेत याचा विचार सदरील शोधप्रबंधात गृहीतकृत्याच्या आधारे शास्त्रीय विवेचन करण्यात येणार आहे. ग्रामीण साहित्याच्या मर्यादा या पुढील प्रमाणे सांगता येतील. बदलत्या खेडयांचे चित्रण, जागतिकीकरण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, मध्यमवर्गीय संस्कार, भौतिक सुखाच्या मृगजळातील तरूण पिढी, स्त्री सुखदुःखे इत्यादी मर्यादा समोर ठेऊन त्यांच्या सर्वांगाचे शास्त्रीय विवेचन केले जाणार आहे.

ग्रामीण साहित्याचे महत्त्व मराठी साहित्यात फार मोठे आहे. कारण सदाशिव पेठे बाहेरही एक मोठे जग आहे. हे जग शहरी जगापेक्षाही खूप मोठे आहे. त्याचे प्रश्न आणि समस्याही खूप मोठया आहेत. ते जग म्हणजे ग्रामीण जीवन. ग्रामीण जीवन व त्यांचे चित्रण करणारे साहित्य म्हणजेच ग्रामीण साहित्य होय. ग्रामीण जीवन चित्रीत करण्याचा पहिला वास्तववादी प्रयत्न ग्रामीण लेखकांनी केला. ग्रामीण साहित्यातून ग्रामजीवनाच्या सर्व अंगाना स्पर्श केला आहे. त्यांची जीवनपद्धती, संस्कृती, गावगाडा,

सणवार, उत्सव, पार आणि शिवार, बेकारी, दुष्काळ, आत्महत्या, जीवनसंकेत, रीतीरिवाज, खाण-पान, यांचे सर्व संस्कार प्रथम ग्रामीण साहित्यात उमटले. तेंव्हा त्याचे महत्त्व काय ? याचे या शोधप्रबंधात संशोधक या वरील गोष्टींचा शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करणार आहे.

येथे संशोधन कर्त्याने ग्रामीण साहित्याचे संशोधन करण्याचे ठरविले आहे. ग्रामीण साहित्याचे संशोधन करीत असतांना ग्रामीण साहित्यविषयक साधन सामुग्रीचा वापर करुनच संशोधकाला कार्य करावे लागणार आहे.

मराठी ग्रामीण - साहित्याची निर्मिती साधारणतः ९० वर्षापासून ते आजपर्यंत होत आहे. त्यात कविता, कथा, कादंबरी, नाटक इत्यादी साहित्य प्रकारात भरपूर प्रमाणात लेखन झालेले आहेत. पण मराठी ग्रामीण साहित्याचे म्हणावे तितकेसे समीक्षण अथवा संशोधन झालेले दिसून येत नाही.

तेंव्हा ग्रामीण साहित्याच्या विकासाच्या दृष्टीने त्या विषयी मूलभूत संशोधन करणे महत्त्वाचे ठरते. उपरोक्त वरील सर्व बाबींचे गांभीर्य लक्षात घेऊनच संशोधन कर्त्याला संशोधनाचा सदरील विषय महत्त्वाचा वाटतो. त्या दृष्टीने त्यांना संशोधनाची गरज वाटते व ते त्यांचे शास्त्रीय विवेचन आपल्या शोधप्रबंधात करून निष्कर्ष काढले जाणार आहेत.

अनुक्रमणिका

प्रकरण पहिले : ग्रामीण साहित्यातील ग्रामसंस्कृतीचा विकास

* १९६० पूर्वीचा कालखंड
* १९६० नंतरचा कालखंड

प्रकरण दुसरे : ग्रामीण साहित्यावर ग्रामसंस्कृतीचा प्रभाव

* ग्रामीण संस्कृतीचे स्वरूप
* ग्रामीण साहित्याची निर्मिती व ग्रामीण संस्कृतीचे घटक
* ग्रामीण संस्कृती आणि ग्रामीण साहित्य

प्रकरण तिसरे : सदानंद देशमुखांचे ग्रामीण साहित्यातील स्थान

* सदानंद देशमुखांचे साहित्य लेखन
* सदानंद देशमुखांच्या लेखनाचे वेगळेपण
* सदानंद देशमुखांच्या साहित्याचा विषय व विशेष
* सदानंद देशमुखांचे साहित्यातील महत्त्व

प्रकरण चौथे : सदानंद देशमुख यांच्या साहित्यातील ग्रामसंस्कृतीचे दर्शन

* कविता व ललित लेख यांच्या काव्यात्मक शैलीतून व्यक्त होणारे ग्रामजीवन
* कथेतून व्यक्त होणारे समग्र ग्रामसंस्कृतीचे दर्शन
* कादंबरीतून व्यक्त होणारे बदलते ग्रामदर्शन

प्रकरण पाचवे : सदानंद देशमुख यांच्या साहित्यातील बदलते ग्रामजीवन

* म.फुलेंच्या क्रांतदर्शी व वास्तववादी प्रतिभेचा व दृष्टीचा वारसा
* वास्तववादी ग्रामदर्शन
* सामान्य शेतकरी हाच साहित्याचा केंद्रबिंदू
* २१ व्या शतकाच्या उंबरवठयावरचे बदलत्या खेडयाचे चित्रण
* बदलती ग्रामीण मानसिकता व बदलती जीवनपद्धती यांचे दर्शन

प्रकरण सहावे : समारोप

प्रकरण पहिले

ग्रामीण साहित्यातील ग्रामसंस्कृतीचा विकास

१९६० पूर्वीचा ग्रामीण साहित्याचा काळ ग्रामीण साहित्याच्या संक्रमणाचा काळ होता. याच काळात महात्मा गांधीजींनी 'खेडयाकडे' चला असा संदेश दिला तेंव्हा नागर व ग्रामीण यांचे अंतर लक्षात येऊ लागले. याच काळात ग्रामीण साहित्य हे मध्यवर्ती धारेशी संवादी असेच होते. या काळातील साहित्यात ग्रामसंस्कृती पेक्षा शहरी संस्कृतीचा प्रभाव साहित्यातून व्यक्त होतांना दिसतो. याच काळात अस्सल ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडविण्याऐवजी वास्तवाभास निर्माण करण्याचा प्रयत्न केला. रंजनपरता, योगायोग, रोमँटिक प्रवृत्ती, प्रणयचित्रण, इ.घटकांना ग्रामीण साहित्यातून स्थान देण्यात आले. यात ग.ल.ठोकळ, ग.ह.पाटील, (गावगुंड, लिंबोळया) इ.साहित्यकृतीतून आपणास तत्कालीन ग्रामीण संस्कृतीचा विकास समजून घेता येणार आहे.

१९६० नंतर ग्रामीण साहित्यातून ग्रामसंस्कृतीने वास्तवपूर्ण चित्रण मोठया प्रमाणात साहित्यातून झालेले दिसून येते. त्यात व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, उध्दव शेळके, बोराडे, आनंद यादव (माणदेशी माणसं, टारफुला, धग, पाचोळा, गोतावळा) इत्यादी अनेक लेखकांनी ग्रामीण साहित्यातून ग्रामसंस्कृतीचा आलेख रेखाटला व तो वास्तववादी असून अस्सल ग्रामीण मातीचा वास या त्यांच्या साहित्यकृतीतून दरवळतो. अशा प्रकारे या कालखंडातील ग्रामीण लेखकांनी ग्रामीण साहित्याचे दालन समृध्द केलेले दिसून येते.

याच काळात वैचारिक बांधिलकीतून लेखक लिहू लागले. ग्रामीण साहित्य चळवळीचा प्रारंभ, ग्रामीण भागातील नवशिक्षित तरूण लेखकांची साहित्य निर्मिती होऊ लागली. तेंव्हा त्याचे मनोविश्व साहित्यातून प्रकट होऊ लागले. आणि आपण अनुभवलेले, कष्टलेले जीवन हाच ग्रामीण साहित्याचा विषय झाला. वरील सर्व बाबींचा सांगोपांग शास्त्रीय विवेचन प्रस्तुत प्रकरणात केला जाणार आहे.

प्रकरण दुसरे

ग्रामीण साहित्यावर ग्रामसंस्कृतीचा प्रभाव

जगातील कोणत्याही साहित्यावर समाजसंस्कृतीचा प्रभाव त्या त्या काळात त्या त्या साहित्याकृतीवर पडत असतो. त्याला ग्रामीण साहित्य ही अपवाद नाही. ग्रामीण साहित्यात ग्रामीण जीवन, ग्रामीण लोककला, लोकसमजुती, लोकरूढी, संकेत, गावगाडा, निसर्ग, शेती, ग्रामीण संस्कृती, कारू-नारू, या सर्व घटकांचा ग्रामीण साहित्यावर प्रभाव पडतांना दिसतो. याचे साधार विवेचन सदरील प्रकरणात केले जाणार आहे.

प्रकरण तिसरे

सदानंद देशमुख यांचे ग्रामीण साहित्यातील स्थान

१९९० नंतरचे एक महत्त्वाचे व आघाडीचे साहित्यिक असून कथा, कादंबरी, कविता, ललित लेख इ. विविध प्रकारचे साहित्य लेखन करून ग्रामीण साहित्यात मोलाचे योगदान दिले. महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा जपणारे लेखक असून म.फुलेंप्रमाणेच सामान्य शेतकरी हाच त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू आहे. देशमुखांनी आपल्या साहित्यातून एका वेगळया जगाचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बेकारी, पाणी प्रश्न, जागतिकीकरण, विकेंद्रीकरण, स्त्री दुःखे, भौतिक मृगजळात भुललेली तरूण पिढी, बदलते खेडे, दोन पिढयातील संघर्ष इ.अनेक विषयांना स्पर्श करून ग्रामीण साहित्यात आपले स्थान वरच्या पातळीवर ठेवण्याचे कार्य केले. याचा सखोल व शास्त्रीय दृष्टीकोनातून विचार प्रस्तुत प्रकरणात केला जाणार आहे.

प्रकरण चौथे

सदानंद देशमुख यांच्या साहित्यातील ग्रामसंस्कृतीचे दर्शन

देशमुख यांनी आपल्या कवितेतून व ललित लेखातून ग्रामीण जीवन व संस्कृतीचे काव्यात्मक दर्शन घडविले त्यात कौटुंबिक ताणतणाव, मूल्यहिन समाजरचना, बेकारी, यांचे मनोज्ञ दर्शन व बदलत्या खेडयाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला.

देशमुखांनी त्यांच्या कथा या वाङ्.मय प्रकारातून समग्र ग्राम संस्कृती, वास्तवपूर्ण जीवन चित्रण, मानवी मूल्यांचा ऱ्हास, दोन पिढयातील संघर्ष, शेतकऱ्यांच्या होऊ पाहणाऱ्या आत्महत्या, दुष्काळ, मोडकळीला आलेली समाजजीवनाची चौकट, मानसिक संघर्ष इ.अनेक प्रश्नांना त्यांनी आपल्या साहित्यातून वाचा फोडली.

देशमुख यांनी आपल्या कादंबरीतून २१ व्या शतकाच्या उंबरवठयावरील खेडे, बदलते ग्रामीण जीवन, शेतकऱ्यांच्या विविध समस्या व त्यातून निर्माण होणारे अनेक प्रश्न, पाणी टंचाई, राजकीय स्वार्थीपणा, शिक्षणाचा बाजार इ.अशा असंख्य प्रश्नांची चर्चा आपल्या कादंबरीच्या माध्यमातून त्यांनी मांडल्या आहेत.

वरील सर्व प्रकारचे अभ्यासपूर्ण व शास्त्रीय विवेचन करुन सदरील प्रकरणात त्याचे सोदाहरण स्पष्टीकरण दिले जाणार आहे.

प्रकरण पाचवे

सदानंद देशमुख यांच्या साहित्यातील बदलते ग्रामजीवन

देशमुख यांनी त्यांच्या ग्रामीण साहित्यात बदलत्या ग्रामजीवनाचे चित्रण करून आजवरच्या अनेक लेखकांनी स्पर्श न केलेल्या अनेक गोष्टींना व प्रश्नांना त्यांनी स्पर्श करून वास्तववादी ग्रामदर्शन व ग्रामजीवन घडविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सामान्य माणूस सुखी कसा होईल ? त्याच्या घरी लक्ष्मी कशी नांदेल ? अशी फुले प्रमाणेच देशमुखांची इच्छा आहे. देशमुख ज्या मातीत वाढले त्या मातीचा वास त्यांच्या साहित्यातून येतो. समाजाच्या सर्व प्रश्नांना वाचा फोडून ग्रामीण समाजातील अनेक प्रश्नांना त्यांनी आपल्या साहित्यातून मार्ग काढून वाट मोकळी करुन दिली.

या सर्व गोष्टीचे शास्त्रीय विवेचन शोधप्रबंधातील प्रस्तुत प्रकरणात केले जाणार आहे.

प्रकरण सहावे

समारोप

माझ्या या शोधप्रबंधात सदरील प्रकरणात मी प्रथमतः ग्रामीण साहित्यातील ग्रामसंस्कृतीचा विकास, ग्रामीण साहित्यातील ग्रामसंस्कृतीचा प्रभाव, सदानंद देशमुख यांचे स्थान व वेगळेपण, देशमुखांच्या साहित्यातील ग्रामसंस्कृतीचे दर्शन, देशमुखांच्या साहित्यातील बदलते ग्रामजीवन आणि वास्तव या प्रकरणाच्या माध्यमातून संकलित स्वरुपात साहित्य-संस्कृती-ग्रामसंस्कृती आणि सामाजिक वास्तवता यातील परिवर्तनाचा वेध घेत समाज, संस्कृती आणि साहित्य कसे परस्पर पुरक आहेत याची तसेच देशमुख यांच्या साहित्याचा वेध घेत भाषाशैलीचा विचार करणार आहे. हे संशोधन करतांना गुण-दोषांसह नव्या निष्कर्षाची मांडणी करण्याचा प्रयत्न करणार आहे. मात्र ते निष्कर्ष संशोधनांती सिध्द होतील.

संदर्भग्रंथ सूची

१.	ग्रामीण साहित्य आणि संस्कृती	-	मोहन पाटील
२.	ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या	-	डॉ.आनंद यादव
३.	ग्रामीण वाड्.मयाचा इतिहास	-	चंद्रकुमार नलगे
४.	ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही	-	डॉ.वासुदेव मुलाटे
५.	तहान (मनोगत)	-	सदानंद देशमुख
६.	बारोमास (कटू सत्य)	-	सदानंद देशमुख
७.	अक्षरगाथा	-	डॉ.जाधव मा.मा.
८.	ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध	-	डॉ.नागनाथ कोत्तापले
९.	ग्रामीण साहित्य : एक चिंतन	-	डॉ.द.ता.भोसले
१०.	ग्रामीण साहित्य	-	रा.रं.बोराडे
११.	ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव	-	डॉ.आनंद यादव
१२.	ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास	-	डॉ.वासुदेव मुलाटे
१३.	आधुनिक साहित्यातील सांस्कृतिक पार्श्वभूमी	-	डॉ.स.दा.कऱ्हाडे
१४.	साहित्याचे सांस्कृतिक संचित	-	डॉ.प्रल्हाद लुलेकर
१५.	विसाव्या शतकातील महाराष्ट्र	-	डॉ.य.दि.फडके
१६.	अश्वत्याची सळसळ	-	डॉ.रा.ग.जाधव
१७.	ग्रामीण साहित्य विशेषांक	-	डॉ.आनंद यादव
१८.	विचारशलाका	-	श्री म.माटे

१९.	काया मातीत मातीत	-	मधुकर वाकोडे
२०.	कविता आणि प्रतिमा	-	डॉ.सुधीर रसाळ
२१.	साहित्य चिंतन	-	डॉ.जनार्दन वाघमारे
२२.	भूमि आणि भूमिका	-	भास्कर चंदनशिव
२३.	मराठी साहित्य संशोधन : सिध्दांत आणि स्वरूप	-	डॉ.स.दा.कऱ्हाडे

संशोधक

प्रा.वानखेडे बालाजी बाबूराव

मार्गदर्शक

प्रा.डॉ.मार्तंड दिवाकर कुलकर्णी

सहयोगी प्राध्यापक मराठी विभाग प्रमुख,

संशोधक मार्गदर्शक, सरस्वती विद्यामंदीर,

कला महाविद्यालय, किनवट जि.नांदेड